क. रा. म. सा. परिषद, कलबुरगी

या संस्थेचे त्रैमासिक

# माझी मराठी

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

# अंतरंग.....

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded


- संपादकीय..... ३
- फ. म. शहाजिंदे यांचे समग्र वाङ्मय / प्रा. भालचंद्र शिंदे ६
- ज्ञानोपासक व ध्येयवादी रयतसेवक : शं. ब. ऊर्फ अण्णासाहेब सुखटणकर / बॅ. पी. जी. पाटील ४०
- मराठी-कन्नड सांस्कृतिक अनुबंध/प्रा. डॉ. चं. वाघमारे ५२
- कॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने / सुरेश साबळे ५९
- कर्नाटक महाराष्ट्र सीमावर्ती भागातील मराठवाडी बोलीचे विशेष / डॉ. चंद्रकांत बिराजदार ६७
- जीवाभावाची 'कदेरची माणसं'/प्रा. व्यंकटेश वळसंगकर ७७
- 'साहित्यदर्पण' आणि 'विचार मंथन' / प्रा. डॉ. पं. पवार ७९
- 'वाडा चिरेबंदी' नाटकातील कौटुंबिक जिव्हाळा / डॉ. रवींद्र वैजनाथराव बेम्बरे ८५
- पंडवानी गायनशैली आणि तीजनबाई / संजीव अग्निहोत्री ९१
- विहीर / श्री. अ. के. आक्रे ९३
- गुरुजींनी दिलेली जन्माची शिदोरी / गुरय्या रे. स्वामी ११०
- धर्मांतर / सिद्धलिंगय्या, अनु. - बी. ए. कांबळे ११५
- मध्यकालीन क्रांतिकारी व बंडखोर संत : संत जनाई / प्रा. डॉ. विठ्ठल जंबाले १२६
- अध्यात्म आणि प्रचलित समाजव्यवस्था / प्रकाश बिराजदार १३४
- परिषदेची वाटचाल.... १४२

# मध्यकालीन क्रांतिकारी व बंडखोर संत : संत जनाई

● प्रा. डॉ. विठ्ठल जंबाले ●

संत जनाईच्या जन्माने पावन झालेल्या गंगाखेड परिसरात माझा जन्म झाला. बालपणापासून माझी आई जात्यावरील दळण दळताना आणि इतर कष्टाची कामे करताना श्रमपरिहार म्हणून अनेक लोकगीते गात असे. तशा अनेक महिलासुद्धा जात्यावरील ओव्या गात असतात. त्यामध्ये 'सुंदर माझे जाते गं'[१] हे जनाईचे ओवीगीत सर्वमुखी ऐकायला मिळते. मी कधी गंगाखेड येथे संत जनाबाई संस्थानामध्ये जात असे. तिथे हरि नामस्मरण करीत अखंडपणे वीणा घेऊन वारकरी उभा असे. त्यावर कधीतरी लिहावे वाटे. यामधून उतराई होण्यासाठी प्रस्तुत चिंतनास संशोधनात्मक वाट मोकळी करण्याची संधी अध्यापनातून मिळाली; परंतु जनाईची आक्रमकता, सडेतोडवृत्ती, निर्भयता, बंडखोरपणा, सबंध व्यवस्थेला आव्हान देण्याची धमक मला खुणावत होती. कै. शेषाबाई महाविद्यालयातील स्नेहीजनांच्या ग्रंथनिर्मितीच्या प्रकल्पामधून या चिंतनास स्वतंत्रपणे लेखनरूप देता येत आहे.

संतवाटिकेमध्ये 'जाईचा वेल' असे ज्या संत कवयित्री जनाईबद्दल गौरवोद्गार काढले आहेत, ते अगदी सार्थ वाटतात. कारण वारकरी संप्रदायामध्ये आणि मराठी सारस्वतांमध्ये शतकानुशतके त्यांच्या कार्याचा सुगंध दरवळत आहे आणि आगामी काळातही तो दरवळतच राहणार, याबाबत यत्किंचितही शंका नाही. कर्माची, धर्माची आणि समाजाची (पर्यायाने इतरही) बंधने झुगारून देऊन संत नामदेवप्रणित वारकरी चळवळीमध्ये ती सहभागी होते आणि आत्मोद्धार साधते. मागील हजारो वर्षांपासून भारतीय स्त्रियांना व्यवस्थेने कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक, राजकीय आणि आर्थिक अधिकार दिलेले नव्हते. उलट ब्राह्मण, वैश्य, क्षत्रिय, शूद्र या चातुर्वर्ण्यव्यवस्थेत सकल वर्णाधिष्ठित महिलावर्ग तळाच्या गाळामध्ये खितपत पडलेला होता, त्या काळात जनाई किंवा तत्सम स्त्रियांना चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेची मजबूत तटबंदी उल्लंघन करण्याची मुभा नव्हती. भारतीय



समाज वर्णव्यवस्थेमध्ये विभागलेला होता. अशा काळात जनाईचे कर्तृत्व बहरले.

जनाईचा कालखंड म्हणजे नामदेव समकालीन. तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात इ. स. १२७० च्या सुमारास (संत नामदेव समकालीन व समवयस्क असल्याचे उल्लेख आढळतात यावरून) दमा आणि करूंड या दांपत्याच्या पोटी गंगाखेड येथे जन्म झाला. नरसी बामणी येथे दामा शेट्टी यांच्या घरी संत नामदेवाच्या सहवासात बालपण आणि जडणघडण. संतमेळ्यातील संत मंडळींचे सान्निध्य तिला लाभले. तिने त्यामधून जीवनाची सार्थकता शोधली आणि आपला उद्धार करून घेतला. चौदाव्या शतकाच्या मध्यापर्यंत नामदेव आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या सहवासात जीवन व्यतीत केले. त्यांच्या कुटुंबाचा एक हिस्सा बनून जनाईने जीवनातील यशापयश साध्य केले. 'नामयाची दासी जनी' अशा अभिनिवेशाने ती आयुष्यभर मिरविण्यातच जगण्याची सार्थकता शोधते. जनाईने आत्मोन्नतीसह आपल्याला लाभलेल्या जन्मजात भावशील मनातून साहित्यसृजन साधले आणि त्यासोबतच स्वोद्धार केला. जीवनाच्या पटलावरती वारकरी संप्रदायातील विचारधारा प्रमाण मानली. तसेच सबंध विश्वामध्ये त्रिकालाधित वंदनीय आस्थास्थान आणि अस्मितादर्श महाराष्ट्राचे आराध्य दैवत पंढरपूर येथील श्री विठ्ठल/पांडुरंग/पंढरीनाथ/पंढरीराया/पंढरीचा राणा/श्रीरंग अशा बहुविध नामांनी गौरविलेल्या श्रीविठ्ठलावर जनाईने अधिराज्य गाजविले. त्याला चोररूपी बंदिखान्यात पकडून ठेवणे, सखा-सांगाती म्हणून जिव्हाळा जपणे, पतीपरमेश्वर म्हणून त्याच्याशी सलगी करणे आणि जगतामधील संसारी जीवनातील विविध नात्यांमध्ये जनाईने त्याला गोवले. यामधून परमेश्वरास मानवरूप अधोरेखित करणारी जनी आगळी छाप टाकते. उलटपक्षी परमेश्वरावर सृष्टीमधील विभिन्न नातेसंबंध कथन करणारी जनाई मानवी मनाचा तळ ढवळून काढते. तिच्या वैयक्तिक उन्नयनशील जीवनाचा मागोवा तिच्याच अभंगवाणीमधून घेता येतो. तो पुढीलप्रमाणे -

## विद्या हेच धन (शिक्षण महात्म्य)

आधुनिक काळात सबंध विश्वामध्ये शिक्षणविषयक महत्त्व विशद करण्यात येत आहे. मानवी प्रगतीचे मर्म शिक्षणामधून जाणवत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि इतर शिक्षणतज्ज्ञांनी शिक्षणविषयक विचारमंथन घडवून आणले आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, ते प्राशन केल्यानंतर माणूस निश्चितच गुरगुरल्याशिवाय राहणार नाही' असे

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist.Nanded

संबोधन केले. तसेच त्या अगोदर महात्मा फुले आणि तत्कालीन विचारवंतांनी मानवी प्रगतीचे मूळ विद्या हेच सांगितले. महात्मा फुले यांच्यां 'विद्येविना मती गेली.........' या अखंड रचनेमधील मार्मिक संदेश 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभुती....' या संत तुकारामांच्या अभंगामधील उत्कर्षाचे गहन तत्त्वज्ञान विशद करणारे आहे. त्याचप्रमाणे संत जनाईच्या अभंगामधील -

*'बाई मी लिहिणे शिकले मी सद्गुरूपाशी ।*
*नामदेवाचे प्रताप । शिरी विठोबाचे हात*
*जनी म्हणे मात । पुसा ज्ञानेश्वरांशी'*[२]

या रचनेतून सद्गुरूरायापाशी लिहिणे शिकली, त्याचे प्रताप नामदेवांचे मोठेपण आणि साक्षरतेचे महात्म्य कथन केले आहे. याद्वारे पारंपरिक, आध्यात्मिक आणि शैक्षणिक पर्यावरणाची चौकट निदर्शनास येतेच; परंतु यामधून मागासलेल्या बहुजन समाजातील शोषित, पीडित, उपेक्षित माणसांना शिक्षण हाच आत्मोद्धाराचा सन्मार्ग असल्याची जाणीव होते. आधुनिक कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांमधील मानवकल्याणाचे वास्तव अधोरेखन आणि जनाईचे अभंगवर्णन यात साम्य आहेच. ज्या बहिणाबाईचे नाव आज उत्तर महाराष्ट्र विद्यापीठास देण्यात आले आहे, त्या तोडीचे योगदान लोकविद्यापीठाच्या स्थापनेमध्ये जनाईचे आहे. साधारणतः सातशे वर्षांपूर्वी जनाईने निर्माण केलेली आणि उपभोगलेली आध्यात्मिक लोकशाही आणि आत्मोन्नतीचे साधन म्हणून शिक्षणाबद्दलचे लेखन-वाचनाबद्दलचे चिंतन जनाईच्या उपरोल्लेखित अभंगातील विषय आणि आशयाच्याच अनुषंगाने औचित्यपूर्ण आहे. आगामी पिढ्यांना प्रेरक आहेच.

**स्त्रीदास्याचा धिक्कार आणि मानवमुक्तीचा उद्घोष**

संत प्रभावळीतील आगळे उठावदार व्यक्तित्व लाभलेली जनी जाती-धर्म-पंथ-संस्कृती यांच्या तटबंदी उद्ध्वस्तीकरणाबाबत विचार प्रकट करते. समाजातील आध्यात्मिक, धार्मिक, सामाजिक विषमतेचा धिःकार करते. हजारो वर्षांपासून बरबटलेल्या अनिष्ट प्रथांवर कडाडून प्रहार करते. समता प्रस्थापित करणारा सामाजिक न्यायाचा विचार प्रकट करते. स्त्रीला पारमार्थिक क्षेत्रामध्ये कोणताच आणि कसलाही अधिकार प्राप्त झालेला नव्हता.

स्त्रियांना सबंध हयातभर पुरुषांच्या स्वामित्वामधून उपभोग्य वस्तू म्हणून जीवन व्यतीत करावे लागे. हजारो वर्षांपासून पिढ्यान्‌पिढ्या सबंध महिलाजगत पुरुषसत्ताक संस्कृतीच्या जोखडामध्ये अडकले होते. अशा सांस्कृतिक बंधनांना



झुगारून देऊन तिने आत्मोन्नतीचा मार्ग स्वीकारला. महाराष्ट्रामध्ये भक्ति-चळवळीमधून पंढरपूरचे विठ्ठल हे मिथक तयार झाले आणि त्यास संत प्रभावळी-मधून जनमनात रूजविण्यात आले. त्या मिथकास अव्हेरून आणि त्याच परंपरेमध्ये संत जनाई दाखल झाली होती. तिने 'चूल आणि मूल' या वर्तुळाबाहेर पडून सबंध व्यवस्थेला हादरा दिला. धर्माच्या मक्तेदारांना आव्हान दिले. परमेश्वराशी असलेल्या संबंधाचे वर्णन निर्भयतेने केले आणि त्याच्याबद्दलच्या भावनांचे बेधडकपणे कथन करून सबंध वारकरी संप्रदायामध्ये खळबळ उडवून दिली. ते वर्णन असे -

*'डोईचा पदर आला खांद्यावरी । भरल्या बाजारी जाईन मी ॥ध्रु॥*
*हाती घेऊन टाळ खांद्यावरी वीणा । आता मज मना कोण करी ॥१॥*
*पंढरीच्या पेठे मांडियले पाल । मनगटावर तेल घाला तुम्ही ॥२॥*
*जनी म्हणे देवा मी झाले वेसवा । निघाले केशवा घर तुझे ॥३॥'*[३]

वरील अभंगामधून जनाईच्या बंडखोर व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते. डोईचा पदर, महिलांनी बाजाराला जाणे, परमार्थ मार्गावर वाटचाल करणे, पंढरीच्या पेठेत पाल मांडणे, वेसवा (वेश्या) होणे, केशवाचे (विठ्ठलाचे) घर निघणे या सांस्कृतिक संकेतांचे उल्लंघन करून जनाई निर्धास्त जगते. वरील वर्णनावरून जनाईने वंचितपणाचे दुःख विसरून आध्यात्मिक उंची गाठल्याचे निदर्शनास येते. तत्कालीन समाज व्यवस्थेतील सर्व निर्बंध उखडून टाकून जनाईने भक्तिचळवळीमध्ये सत्ता निर्माण केली. ती ईश्वरावर अधिराज्य गाजवू लागली. परिणामतः शोषित- उपेक्षित समाजामध्ये वारकरी संप्रदायाचा प्रसार होण्यास मदत झाली. बहुजन समाज वारकरी पंथाकडे मोठ्या प्रमाणावर आकृष्ट झाला.

पारंपरिक समाजमनातील पूर्वापार प्रचलित श्रद्धा-अंधविश्वासांना भक्तीच्या सुलभीकरणाच्या प्रकियेमधून वारकरी पंथामध्ये विठ्ठल या प्रतीकाचे दैवतीकरण करण्यात आले. ते दैवत संतमंडळींनी सामान्यजनांपर्यंत पोहचविले. संत-सज्जनांच्या सहवासामधून जनाईने त्याची अनुभूती घेतली, आत्मोद्धाराचा मार्ग अनुसरला. त्या दैवतावर अधिराज्य गाजविले. विठ्ठलावर अधिराज्य गाजविणारी अद्वितीय महिला, तेराव्या-चौदाव्या शतकातील क्रांतिकारी -बंडखोर स्त्री म्हणून जनाईचा लौकिक वाढला. इतर संत आणि भक्तजनांपेक्षा तिचे कर्तृत्व, नेतृत्व, श्रेष्ठत्व आणि व्यक्तित्व निराळे होते. विठ्ठलाचा उल्लेख विठाबाई, विठाई अशा स्त्रीनामाने फक्त जनाईच करू शकली. ते खालीलप्रमाणे पाहता येते.

*'येगं येगं विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥१॥*



ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

*भीमा आणि चंद्रभागा । तुझे चरणीच्या गंगा ॥२॥*
*इतुक्यासहित त्वां बा यावें । माझे रंगणी नाचावें ॥३॥*
*माझा रंग तुझे गुणीं । म्हणे नामयाची जनी ॥४॥'*[४]

तसेच विठ्या, विठू, विठोबा असे एकेरी उल्लेख इतर संतजनांनी केल्याचे आणि परमेश्वरास ग्राम्य, अश्लील शब्दांत दूषणे दिल्याचे सकल वारकरी संप्रदायातील साहित्यामध्ये आढळत नाही. ते फक्त जनाईच करू शकली, हे येथे विशेषत्वाने नोंद करावे वाटते.

*'अरे विठ्या विठ्या । मूळ मायेच्या कारट्या*
*तुझी रांड रंडकी झाली । जन्मसावित्री चुडा त्याली*
*तुझें गेलें मढें । तुला पाहून काळ रडे*
*उभी राहूनि आंगणीं । शिव्या देत दासी जनी'*[५]

वरील अभंगामधील वर्णन पाहिल्यानंतर जनाईने विठ्ठल दैवताचा जाहीर निषेध प्रकट केलेला आहे. विठ्ठलास श्लील-अश्लील, तिखट, अपशब्दांमध्ये दूषणे दिलेली आहेत. फक्त जनाईनेच एवढ्या अधिकारवाणीने विठ्ठलाशी ऋणानुबंध व्यक्त केलेला आहे. रांड, रंडकी, मढे जाणे अशा शिव्या उपरोल्लेखित रचनेमध्ये आढळतात. हे जनाईच्या बंडखोर, क्रांतिकारी आणि निर्भय व्यक्तित्वाचे नितळ आणि निर्मळ प्रतिबिंब आहे. तसेच परमेश्वराचे मानवरूपी वर्णन तिच्या अभंगांचा गाभाच आहे. तिने अभंगामधून परमेश्वरास प्रियकर, सखा, सोबती, सांगाती, सवंगडी, जीवलग, घर निघणे अशी संबोधने दिलेली आहेत. महाराष्ट्र भूमीमध्ये समाजसुधारणा, भक्ती आणि आत्मोद्धार या हेतूने प्रेरित होऊन जे अनेक संत होऊन गेलेले आहेत, त्यामधील एक अग्रणी नाव जनाई. 'म्हणे नामयाची दासी जनी', 'दासी जनी म्हणे', 'दासी जनी नामयाची' यांसारख्या अनेक पदनामाने स्वतःचे नामनिर्देशन करते. विठ्ठल भक्तीत अखंड रममाण होऊन आपले सर्वस्व त्यास मानणारी एक स्त्रीसंत. कधी आवडीने विठ्ठलाचे नाम घेत तल्लीन होऊन भजणारी, तर कधी त्याच्यावर संतापणारी जनी. एक ना अनेक अशी तिची रूपे तिच्या अभंगांमध्ये सापडतात. जनाईच्या आयुष्यातील भावकल्लोळ म्हणजे तिचे अभंग. तिच्या जगण्याच्या विविध भावावस्थांचे आविष्करण म्हणजे तिची अभंगवाणी.. कधी विठ्ठलाचे गुणगान करताना जनी त्याला लेकुरवाळा संबोधते आणि सारे तिचे सखे सोबती हे जणू काही विठ्ठलाची लेकरे आहेत, अशी तल्लीनतेने वर्णन करते –



*'विठू माझा लेकुरवाळा । संगे गोपाळांचा मेळा*
*निवृत्ती हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी*
*पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताई सुंदर*
*गोरा कुंभार मांडिवरी । चोखा जीवा बरोबरी*
*बंका कडियेवरी । नामा करंगुळी धरी*
*जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा'*[६]

थोर संतजन ही एकेक परमेश्वराची लेकरे ! प्रत्यक्ष परमेश्वरसुद्धा कौतुकाने यांना खेळवत आहे, हे निःसंशयच. वयाने लहान असली तरी समज आणि जाणिवेने महान अशी चौघे दैवी लेकरे आणि त्यांचे सोबती विठ्ठलाच्या अंगाखांद्यावर एखाद्या अल्लड नातवाने आपल्या आजोबाच्या अंगावर बागडावे, अशाच प्रेमाने आणि आपुलकीने बागडत आहेत आणि जगाच्या दृष्टीने तो सर्वेसर्वा, परमेश्वर असला तरी या नातवांसाठी तो लहान पोर झाला आहे. नातवांना खेळवणे हा खरोखर आजोबांच्या आयुष्यातील आनंदाचाच क्षण असतो. तो भक्तगणांमध्ये एवढा समरस झाला आहे, त्याचे तौलनिक विवेचन करताना 'पाणी तेंचि मेघ, मेघ तेंचि पाणी । काय या दोन्हीपणीं वेगळिक'[७] या अभंगामधील माती-धूळ, भेडा- भिंती, साखर-गोडी, डोळा- बुबुळ, वदन-ओठ, जीभ पडजीभ या तुलना केलेल्या आहेत. त्यातून देव-संत यातील अभिन्नत्व विशद केलेले दिसते. असे साक्षात देवस्वरूप असलेले संत जेव्हा एकत्र येतात, तेव्हा विठ्ठलसुद्धा त्यांच्यात रममाण होतो. नामसंकीर्तनामध्ये विठ्ठल रंगून जातो. मानवाची काय कथा ! मग जनी सांगते त्याप्रमाणे विठ्ठलास रंगात रंगवून टाकणाऱ्या संतांना शरण जावे. अर्थात, ज्या संताला शरण जायचे त्याची परीक्षा 'सखा विरळा ज्ञानेश्वर । नामयाचे जो जिव्हार । ऐशा संतां शरण जावें । जनी म्हणे त्याला घ्यावें'[८] घेऊन शरण जावे. केवळ भगवी वस्त्रे परिधान केलेल्या मनुष्याला नव्हे, असे कृपाळू संत उपदेश करतात. संतसहवासातील कुणाच्याही श्रद्धा एकदम विचलित न करता हळूहळू त्याला उन्नतीच्या मार्गावर घेऊन जातात. संत अशा पद्धतीने योग्यरितीने नांगरट झालेल्या जमिनीत शिकवणुकीचे बीज पेरतात आणि मग बघता बघता डौलदार पीक येऊन तो मनुष्य साधक सिद्ध होतो. योगी होतो. संतपदाला पोहोचतो; पण हे सर्व सुरू होते नामापासून. म्हणून जनी 'जन्मा येऊनियां देख । करा देहाचें सार्थक । घ्यावे नाम विठ्ठलाचें । तेणें सार्थक देहाचें । ऐसा नामांचा महिमा । शेषा वर्णितां झाली सीमा । नाम तारक त्रिभुवनीं । म्हणे नामयाची जनी'[९] असे नामचिंतनाचे



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded